पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८, लेखा विभाग
क्र.लेखा/२९/कावि/९२ /२०२१
दिनांक :- ०९/०३/२०२१

विषय : सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील भांडवली व महसुली कामांच्या देयकांच्या अदायगीबाबत.

परिपत्रक,

सन २०२०-२०२१ आर्थिक वर्ष दि.३१/०३/२०२१ अखेर संपूष्टात येत आहे. असे निदर्शनास आले आहे की, अद्याप काही विभागांनी त्यांचेकडील चालू आर्थिक वर्षातील भांडवली / महसुली कामांची देयके अदायगी कामी लेखा विभागाकडे सादर केलेली नाहीत. दर वर्षी मार्च महिन्यामध्ये शेवटच्या २ ते ३ दिवसात मोठ्या प्रमाणावर देयके लेखा विभागाकडे अदायगीकामी सादर केली जातात. सर्व प्राप्त देयके ही दि.३१/०३/२०२१ पर्यंतच अदा करावयाची असल्याने लेखा विभागास देयके तपासणीकामी पूरेसा कालावधी मिळत नाही.

सबब, सर्व विभागांना सुचीत करण्यात येते की, चालू आर्थिक वर्षातील आपले विभागाकडील सर्व प्रकारची देयके दि.२६/०३/२०२१ पर्यंत लेखा विभागाकडे सादर करावीत जेणेकरून लेखा विभागास दि.३१/०३/२०२१ पर्यंत देयकांची योग्य तपासणी करून अदायगी करणे शक्य होईल. विलंबाने देयके लेखा विभागास सादर केल्यामुळे चालू आर्थिक वर्षात अदायगी न झाल्यास संपूर्ण जबाबदारी ही संबंधीत विभागाची राहील याची नोंद घ्यावी.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति:- सर्व संबंधीत विभाग